# ‘प्रेस नोट’

दिनांक १५/०९/२०२६

## पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ-३, मुंबई.

### मुलूंड पोलीस ठाणे, मुंबई

**‘‘सोशल मिडीयाद्वारे ब्लॅकमेलींग व खंडणी उकळणे या प्रकरणातील आरोपीस अटक केलेबाबत’’**

मुलूंड पोलीस ठाणे हद्दीत वास्तव्यास असलेल्या आरोपीत इसमाने पिडीतेसमवेत स्नॅपचॅट व अन्य सोशल मिडीयाच्या माध्यमातून संपर्क साधून, पिडीत महिलेशी ओळख निर्माण करून पिडीतेचे फोटो व व्हिडीओ प्रसारीत करण्याची धमकी देउन पिडीतेकडून खंडणी उकळली. तसेच पिडीतेने आरोपी इसमाच्या आणखी मागण्या मान्य न केल्याने आरोपीने पिडीतेचा व्हिडीओ पिडीतेचे नातेवाईक व अन्य लोकांना पाठविला म्हणून यातील पिडीतेने मुलूंड पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरून गु.र.क्रं ९२४/२०२६ कलम ३०८ (२), ३५१ (२) भा.न्या.सं. सह कलम ६६(ई), ६७ (अ) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेउन मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथक तयार करून गुन्ह्याचा तपास सुरू करण्यात आला. गुन्ह्याचे तपासादरम्यान कौशल्यपुर्ण तांत्रिक तपास करून आरोपीची ओळख पटवून त्याचे ठावठिकाण्याबाबत विश्वनीय माहिती प्राप्त करुन आरोपी सतनाम मनदिप सिंग, वय २२ वर्षे, यास रा.ठि. आदेश नगर, गल्ली नंबर ०२, पीपल पेट्रोल पंपाजवळ, कोट कपुरा रोड, श्री मुक्तसर साहिब, राज्य पंजाब येथून अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. देवन भारती, पोलीस आयुक्त सो, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोज शर्मा, पोलीस सहआयुक्त (का व सु), मा. श्री. धनंजय कुलकर्णी, अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई, मा. श्री. अभयसिंह देशमुख, पोलीस उपआयुक्त, पुर्व परिमंडळ-०३, मुंबई, श्री. सुदर्शन होनवडजकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष घाटेकर, मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई, पोलीस निरिक्षक नितीन खाडगे, सहाय्यक पोलीस निरिक्षक अभिजीत टेकवडे, पोलीस उप निरिक्षक सुमित सोनवणे, परशराम सुर्यगंध, पोशि/राजेंद्र ठाकूर, पोशि/प्रदीप पवार, मपोशि/रूपाली हडवळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

आवाहन:- नागरीकांनी अनोळखी सोशल मिडीया अकाउंटवरून येणाऱ्या फ्रेंड रिक्वेस्ट, मेसेज व व्हिडीओ कॉल स्विकारताना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात येत असून कोणत्याही व्यक्तिने अश्लील व्हिडीओ/फोटो प्रसरित करण्याची धमकी देउन पैशांची मागणी केल्यास घाबरून न जाता तात्काळ नजिकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई पोलीसांचे वतीने करण्यात येत आहे.